# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

मध्यवर्ती कार्यालय : हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन,
सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी रेल्वे स्टेशनजवळ, मुंबई - ४०० ०१३
दूरध्वनी - ०२२-४३२२६८०८/८१२ ई मेल - mlwbcivil@gmail.com


जा.क्र.मका/बांधकाम/२०२२/१२८ दिनांक : १०/०६/२०२२

## जाहीर प्रकटन

विषय – पावसाळ्याच्या अनुषंगाने करावयाची विविध दुरुस्ती कामे - वास्तुविशारद नियुक्त करणेबाबत.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळास पावसाळ्याच्या अनुषंगाने खालील नमूद दुरुस्ती कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणीकृत ठेकेदार यांच्यामार्फत राज्य दरसूची (एस.एस.आर) नुसार करुन घ्यावयाची आहेत. त्यासाठी आवश्यक दरपत्रके व निविदा कागदपत्रे तयार करणे, कामांवर देखरेख ठेवणे व कामांची देयके प्रमाणित करणे यासाठी बृहन्मुंबई महानगर पालिका अथवा तत्सम प्राधिकरणाकडे नोंदणीकृत वास्तुविशारद यांचेकडून दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

१) कामगार कल्याण भवन, अंधेरी, मुंबई येथील अधिकारी निवास क्रमांक २ येथे पावसामुळे छतावरुन व खिडकीतून होणारी पाणी गळती रोखणे.
२) ललित कला भवन, नायगाव, मुंबई येथील प्र.सहायक कल्याण आयुक्त यांचे दालनात पावसाच्या पाण्यामुळे छतावरुन होणारी पाणीगळती रोखणे.
३) मध्यवर्ती कार्यालय, प्रभादेवी, मुंबई येथील टॉयलेट व बाथरुमच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी उपाययोजना करणे.
४) कामगार क्रीडा भवन, प्रभादेवी, मुंबई येथील व्यायामशाळेत पावसामुळे झिरपणारे जमिनीतील पाणी रोखण्याकरीता उपाययोजना करणे.

वास्तुविशारद यांनी वरील नमूद इमारतींची / जागांची पाहणी करुन कामाचा आवाका लक्षात घ्यावा व त्यानंतर दरपत्रक सादर करावे. महाराष्ट्र शासनाचे सर्व अनुषंगिक अधिनियम/नियम/निकष यांच्या अधीन राहून दुरुस्ती कामे करुन घेण्याची जबाबदारी वास्तुविशारद यांची राहील. दरपत्रकासोबत जीएसटी क्रमांक व इतर आवश्यक कागदपत्रे जोडावीत. मंडळाच्या मध्यवर्ती कार्यालय, प्रभादेवी, मुंबई येथे दिनांक १८/०६/२०२२ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत बंद लिफाफ्यात दरपत्रक सादर करावेत. सदर दरपत्रक दिनांक १८/०६/२०२२ रोजी दुपारी ३ वाजता उघडण्यात येतील.

आपला विश्वासु

(रविराज इळवे)
कल्याण आयुक्त